# मांजरा धरणामुळे हरितक्रांती, १८ हजार हेक्टरवर हिरवा शालू




ड्रोन छाया- गजानन तोडकर,कळंब

दैनिक आरंभ मराठी
www.arambhmarathi.com
दैनिक धाराशिव
वर्ष 2 रे अंक 99
मंगळवार दि.20 मे 2025
RNI NO -2023/90078
पाने 04 किंमत रू 5

अमोलसिंह चंदेल/आरंभ मराठी

**शिराढोण-दुष्काळसदृश्य मराठवाड्यातील धाराशिव व बीड जिल्ह्याच्या सिमेवर १९८२ साली मांजरा नदीवर बांधण्यात आलेल्या मांजरा धरणाने परिसरात हरितक्रांती घडवून आणली आहे. दुष्काळाचा कायम शाप असलेल्या या पट्ट्यात सध्या ऊस शेतीसह अन्य फळबागांनी आणि हिरव्यागार शेतीने बहरून गेला आहे.**

मांजरा धरणाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर या ठिकाणी अडवण्यात आलेल्या नदी प्रवाहाच्या माध्यमातून साठविण्यात येणाऱ्या पाण्याचा उपयोग परिसरातील लोकांची तहान भागविण्याबरोबरच या परिसरातील शेती व्यावसायासाठी पूर्ण क्षमतेने करण्यात येवू लागला.शेतीला पाणी पुरवठा करण्यासाठी नदीच्या मुख्य पात्राबरोबरच ९० कि.मी लांबीच्या डाव्या व ७८ कि.मी.च्या उजव्या कालव्याचा प्रामुख्याने उपयोग करून धरण क्षेत्रातील शेती व्यावसायास उर्जीतावस्था प्राप्त करून देण्यास मोलाची मदत झाली.

## सलग दुसऱ्यावर्षी प्रकल्प ओसंडला,

२२४.०९३ द.ल.घ.मी (आजच्या) साठवण क्षमतेच्या मांजरा प्रकल्प धरण क्षेत्रात २०२४ साली पाऊस झाल्याने सलग दुसऱ्या वर्षी धरण ओसंडून वाहिले होते. कळंब तालुक्यातीलखडकी, लोहटा पूर्व, करंजकल्ला, लोहटा पश्चिम, कोथळा, हिंगणगाव, दाभा, आवाड शिरपुरा, सौंदणा आंबा, वाकडी या गावांतील शेतीसह धरण क्षेत्रातील एकूण १८ हजार हेक्टर शेती क्षेत्रासाठी वरदान ठरले आहे. ऊस शेती तसेच प्रयोगशील शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नातून परिसरात सुबत्ता नांदत आहे.

## शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती

कळंब तालुक्यातील मांजरा तिरावर वसलेल्या १० ते १२ गावांना पैकी झाला. या गावांतील शिवारातून या धरणाचे कालवे गेल्याने शिवारास मुबलक पाणी उपलब्ध झाले. परिणामी मांजरा तिरावरील या गावांचा शिवार १०० टक्के बागायती म्हणून गणला जावू लागला. धरणातून होणाऱ्या मुबलक पाणी पुरवठ्याच्या भरवशावर या गावातील शेतकऱ्यांनी ऊस शेती केली.त्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती झाली.सध्या मे महिन्यातही या परिसरात हिरवळ दिसून येत आहे.

# पुन्हा भूसंपादनच्या हालचाली वाढल्या

## शक्तीपीठ महामार्ग बाधित शेतकऱ्यांचा अधिकाऱ्यांसमोरच आक्रोश

आरंभ मराठी / धाराशिव

**संपादनासाठी धाराशिव जिल्ह्यात प्रशासकीय हालचाली तीव्र झाल्या आहेत. जमीन संपादनाची प्रक्रिया सुरू करण्यासाठी बाधित होणाऱ्या गावात जाऊन शेतकऱ्यांसोबत चर्चा करण्यात येत आहे. परंतु, धाराशिव तालुक्यात मात्र बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांनी या महामार्गाला असणारा विरोध आणखी तीव्र केला आहे. गावसुद शिवारात उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आणि मोनार्क कंपनीच्या प्रतिनिधींसमोर शेतकऱ्यांनी शक्तीपीठ महामार्गाला विरोध दर्शवला असून, भूसंपादन करू देणार नाही अशी भूमिका घेतली आहे.**

धाराशिव तालुक्यातील १७ आणि तुळजापूर तालुक्यातील २ अशा १९ गावातून शक्तीपीठ महामार्ग प्रस्तावित आहे. या महामार्गाला धाराशिव जिल्ह्यातील सर्वच गावातील बाधित शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला आहे. प्रसंगी रस्त्यावर उतरून आंदोलन करत तसेच लाक्षणिक उपोषण करूनही बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांनी शक्तीपीठ महामार्गाला असणारा विरोध तीव्र केला आहे. सोमवारी (दि.१९) धाराशिव तालुक्यातील गावसुद शिवारात उपविभागीय अधिकारी अरुणा गायकवाड, तहसीलदार डॉ. मृणाल जाधव आणि मोनार्क कंपनीचे कर्मचारी शेतकऱ्यांशी चर्चा करण्यासाठी गेले होते. त्यावेळी गावसुद, पोहनेर, सुर्डी, बेगडा या गावातील पन्नास ते साठ बाधित शेतकऱ्यांनी एकत्र येत शक्तीपीठ महामार्गासाठी जमीन देण्यास एकमुखी विरोध केला. यावेळी उपविभागीय अधिकारी यांनी भूसंपादन प्रक्रिया सांगून शेतकऱ्यांना सहकार्य करण्याची विनंती केली. त्यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी एक इंचभर देखील जमीन देणार नसल्याचे सांगितले. भू संपादनासाठी हेक्टरी किती मोबदला दिला जाईल याबाबत शेतकऱ्यांना विश्वासात न घेता शासन मनमानी निर्णय घेत असल्याचा आरोप यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी केला. भूसंपादनासाठी हेक्टरी किती म ोबदला मिळेल हेच अजून स्पष्ट न केल्यामुळे शेतकऱ्यांत संभ्रमाचे वातावरण तयार झाले असल्याचे यावेळी काही शेतकऱ्यांनी सांगितले. पवनार ते पत्रादेवी हा मार्ग धाराशिव तालुक्यातील बागायती जमीन असलेल्या भागातून जात असल्याने याला विरोध होत आहे. जिल्ह्यात जमीन संपादन प्रक्रिया सुरू केली असून, उपविभागीय दंडाधिकारी यांनी उपविभागीय अधिकारी कार्यालय आणि भूमी अभिलेख कार्यालयाला पत्र पाठवले आहे. या आधारावर १९ गावांतील जमीनधारकांना विश्वासात घेण्याचा प्रयत्न प्रशासकीय पातळीवरून सुरू आहे.

### रेडिरेकनर दर कळीचा मुद्दा

समृद्धी महामार्गाप्रमाणे शेतकऱ्यांना रेडीरेकनर दराच्या पाचपट रक्कम देण्यात येणार असल्याची चर्चा आहे. मात्र, शेतकऱ्यांना अजूनही त्याबद्दल काहीच माहिती नाही. उपविभागीय अधिकारी अरुणा गायकवाड यांनी सर्व शेतकऱ्यांनी सहमती दिली तर पाचपट दर दिला जाईल आणि विरोध केला तर सक्तीने भूसंपादन करून चारपट दर दिला जाणार असल्याचे शेतकऱ्यांना सांगितले. भूसंपादन होणाऱ्या गावात रेडीरेकनरचे दर अतिशय नगण्य असल्यामुळे शेतकरी जमीन देण्यास तयार नाहीत.

### अजून दर निश्चित नाही

जमिनी मोजणीच्या प्रक्रियेला सुरुवात होत असली तरी शेतजमीन संपादन करण्यासंदर्भात दर निश्चित झालेला नाही. जमीन मोजणीनंतर हा दर निश्चित केला जाणार असल्याचे सांगण्यात आलेले आहे. शेतकरी वारंवार दराबाबत विचारणा करत होते. मात्र, अधिकाऱ्यांनी यावर थेट उत्तर देणे टाळले. त्यामुळे शेतकरी चिंतेत असून, यापुढे शासनाला सहकार्य करणार नसल्याची ठाम भूमिका शेतकऱ्यांनी घेतली आहे. यावेळी शेतकऱ्यांनी भूसंपादनासाठी यापुढे शेतात पायही ठेवायचा नाही असे निवेदन शासनाला दिले आहे.

### महामार्गाला विरोध असल्याचे निवेदन

मोनार्क कंपनीचे अधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार हे शक्तीपीठ महामार्गासाठी जमीन भूसंपादन करण्याच्या प्रक्रियेसाठी आले होते. सर्व बाधित शेतकऱ्यांनी एकत्रित येऊन शक्तीपीठ महामार्गाला विरोध असल्याचे स्पष्ट केले आहे. तरीही शासनाने भूसंपादन करण्याचा प्रयत्न केल्यास याला तीव्र विरोध केला जाईल.

-प्रशांत बेदरे
बाधित शेतकरी,वरवंटी.

### शक्तीपीठ महामार्गाला शेवटपर्यंत विरोधच असेल

शक्तीपीठ महामार्गाच्या सीमांकनासाठी कोणत्याही परिस्थितीमध्ये कुठल्याही कर्मचाऱ्यांनी आमच्या शेतामध्ये येऊ नये. जर कोणी तसा प्रयत्न केला तर त्यांना योग्य तो धडा शिकवल्याशिवाय आम्ही सोडणार नाही. शक्तीपीठ महामार्गाला सुरुवातीपासून शेवटपर्यंत विरोधच असेल.

-शहाजी साळुंके
बाधित शेतकरी,बेगडा

# कंटेनरच्या धडकेत दोनजण ठार



येरमाळा -: कंटेनरच्या धडकेत दुचाकीवरील दोघे जण ठार झाल्याची घटना सोलापूर-धुळे महाम ार्गांवरील तेरखेड्याजवळ असलेल्या हॉटेल उत्तम जवळ सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास घडली. कंटेनर व दुचाकीमध्ये झालेल्या भीषण अपघाताम ध्ये एक जण जागीच ठार झाला तर उपचारासाठी घेऊन जात असताना एक मरण पावला आहे. धुळ्याकडून सोलापूरकडे जाणारा कंटेनर (.२०. .८९७९) व तेरखेड्याकडून वाशीकडे जाणारी म ोटार सायकल (.१४- २३८२) यांच्यात झालेल्या भीषण अपघातामध्ये मोटार सायकलवरील हनुमंत बनसोडे (रा.बाभळगाव) आणि अमर शिंदे (रा.कोरेगाव,ता.बार्शी) हे दोघे ठार झाले. या अपघाताची माहिती मिळताच येरमाळा पोलिसांनी घटनास्थळी दाखल होऊन जखमीस पुढील उपचारासाठी तात्काळ पाठवण्यात आले होते.मात्र, रस्त्यातच दुसऱ्याचा देखील मृत्यू झाला.या अपघाताने परिसरामध्ये शोककळा पसरली. सदरील अपघाताची नोंद येरमाळा पोलीस ठाण्यामध्ये करण्यात आली असून, पुढील तपास येरमाळा पोलीस करत आहेत.

# दस्तापूरजवळ बलेरो वाहन अपघातग्रस्त अवस्थेत आढळले;संशयास्पद मृत्यू,खुनाचा गुन्हा दाखल

आरंभ मराठी / मुरूम




मुरुम शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दस्तापुर येथील राष्ट्रीय महामार्गावरील पादचारी पुलाच्या खालील बाजूस बुलेरो वाहन (क्रमांक २५ ८००५) अपघातग्रस्त अवस्थेत आढळून आले आहे. वाहनाची पुढील बाजू नुकसानग्रस्त असून आतील बाजूस छोटे छोटे दगड विखुरलेले दिसून आले. वाहनाच्या शेजारीच दाळिंब (ता. उमरगा) येथील रहिवासी तथा वाहनमालक शम शोद्दीन मियाँसाहब पटेल (वय ५६ वर्षे) हे मृत अवस्थेत आढळून आले आहेत. या घटनेची माहिती मिळताच मुरुम पोलीस तत्काळ घटनास्थळी दाखल झाले असून, नागरिकांनीही मोठ्या संख्येने गर्दी केली होती. या मृत्यूमागे अपघात नसून अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरून शमशोद्दीन पटेल यांना मारहाण करून ठार मारले असावे, असा गंभीर संशय फिर्यादीतून व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकरणी मुरुम पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १४०/२०२५, भारतीय न्याय संहिता कलम १०३(१) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्राथमिक तपासात असे आढळून आले आहे की, १८ म ेच्या रात्री १०:३० वाजेपासून ते १९ मेच्या सकाळी ८ वाजेच्या दरम्यान अज्ञात व्यक्तीने ही घटना घडवून आणली असावी. सदर गुन्ह्याचा तपास मुरुम पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप दहिफळे करत आहेत. संशयास्पद मृत्यूमुळे दस्तापुर परिसरात भीतीचे आणि अस्वस्थतेचे वातावरण निम ाण झाले आहे. घटनास्थळावरील परिस्थिती, वाहनाची अवस्था आणि मृतदेहाची स्थिती पाहता पोलिसांनी सर्व शक्यतेचा तपास सुरू केला असून, लवकरच सत्य समोर येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# 'एम्स'कडून वैद्यकीय सेवा, मेडिकलच्या विद्यार्थ्यांनाही तज्ञांकडून धडे

## 'एम्स'सोबत शासकीय मेडिकल कॉलेज काम करणार:आमदार राणा पाटील यांची माहिती

आरंभ मराठी/धाराशिव





धाराशिवच्या शासकिय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयालास अखिल भारतीय आयुर्विमा संस्था अर्थात नागपूर एम्सच्या सहकार्याचा मार्ग आता सुकर झाला आहे. त्यामुळे धाराशिवकरांना आता 'एम्स'कडून अत्याधुनिक वैद्यकीय सेवा मिळणार आहेत. तसेच वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाही एम्सच्या तंज्ञांकडून अद्ययावत वैद्यकीय शिक्षणाचे धडे मिळणार आहेत. नागपूर 'एम्स'आपल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासोबत काम करणार असल्याची माहिती मित्रचे उपाध्यक्ष तथा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.वैद्यकीय क्षेत्रात देशात नावाजलेल्या एम्सचे मार्गदर्शन आता आपल्या शासकीय वैद्यकीय म हाविद्यालयास मिळणार आहे. त्याचबरोबर वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना अद्ययावत आणि दर्जेदार वैद्यकीय शिक्षण देत धाराशिवकरांना 'एम्स'च्या तंज्ञांची वैद्यकीय सेवाही लाभणार आहे. नागपूर 'एम्स'चे कार्यकारी संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. डॉ. प्रशांत जोशी यांनी धाराशिवच्या शासकिय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या अधिष्ठातांना दोन्ही संस्थांमधे अधिकृतपणे एकत्रित काम करण्याबाबत पत्राद्वारे कळविले आहे. 'एम्स'चे तज्ञ धाराशिवच्या वैद्यकीय महाविद्यालयात रुग्णसेवा व वैद्यकीय शैक्षणिक विकासासाठी 'हँड होल्डिंग'ची महत्वपूर्ण भूमिका पार पाडतील. या निर्णया मुळे 'एम्स'चे नागपूर आता वैद्यकीय महाविद्यालय धाराशिवसाठी रेफरल सेंटर म्हणून कार्य करणार आहे. म हाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन शैक्षणिक मार्गदर्शनही उपलब्ध करून दिले जाणार आहे. तसेच जिल्ह्यातील रुग्णांना आता नागपूर येथे सुपर स्पेशालिटी आरोग्य सेवा उपलब्ध होणार आहेत. नागपूर येथील 'एम्स' ही संस्था महाराष्ट्रातील अद्ययावत व आधुनिक उपचार पद्धतीने युक्त अशी एकमेव वैद्यकीय संस्था आहे. धाराशिव नागपूर दरम्यान उपलब्ध परिवहन, रेल्वे सेवा तसेच समृद्धी महामार्गामुळे दोन्ही शहरातील अंतरही आता कमी वेळेत गाठता येणार आहे. त्यामुळे अंतररूग्ण सेवेसाठी ही बाब आणखी सोईस्कर ठरणार असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.

### 'एम्स'च्या तज्ञांचे पाहिले लेक्चर गुरुवारी

'एम्स'नागपूरसारख्या वैद्यकीय क्षेत्रातील नावाजलेल्या संस्थेच्या मार्गदर्शनामुळे धाराशिवचे वैद्यकीय महाविद्यालय भविष्यात वैद्यकीय शिक्षण तसेच आरोग्यसेवेबाबत एक आदर्श वैद्यकीय संकुल म्हणून नावारूपाला येईल. ही संपूर्ण प्रक्रिया धाराशिवच्या वैद्यकीय आणि सामाजिक प्रगतीच्या दृष्टीने एक निर्णायक पाऊल ठरणार आहे. त्यामुळे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांबरोबरच जिल्ह्यातील रुग्णांनाही याची चांगली मदत होणार आहे. २२ मे रोजी त्याची अधिकृत सुरुवात होत आहे. 'एम्स'चे प्राध्यापक दुरदर्शीप्रणालीच्या माध्यमातून डॉ. प्रथमेश कांबळे 'कृत्रिम बुद्धिम त्ता आणि मेंदू-संगणक : संवाद यंत्रणा, नव कल्पना, आव्हाने आणि भविष्यातील क्षितिजे' या विषयावर पाहिले लेक्चर घेणार आहेत.

## १० हजारापर्यंत देणगी,नि:शुल्क दर्शन,

### विश्वस्तांच्या शिफारसीवर भाविकांना २०० रुपये शुल्क

आरंभ मराठी / तुळजापूर

कुलस्वामिनी तुळजाभवानी मातेच्या मंदिरात व्हीआयपी दर्शनासाठी मंदिर संस्थानने व्याख्या निश्चित केली असून, यामध्ये तुळजाभवानी मातेला किमान १० हजार रुपये किंवा त्यापेक्षा अधिक रकमेची रोख देणगी किंवा वस्तू भेट देणाऱ्या भाविकांच्या कुटुंबीयांना नि:शुल्क दर्शन देण्याचा निर्णय घेण्यात आला असून, मंदिर संस्थानच्या विश्वस्तांच्या शिफारसीवर आलेल्या भाविकांना २०० रुपये भरून व्हीआयपी दर्शन घेता येईल. मंदिर संस्थानच्या वतीने तयार करण्यात आलेल्या या नियमावली बाबत अभिप्राय मागवण्यात आले आहेत.मंदिर संस्थानने म्हटले आहे की,महत्वाच्या व अतिमहत्त्वाच्या व्यक्तींसाठी दर्शन सुविधा प्रस्तावित करण्यात आली असून, भक्तांच्या सोयीसाठी व व्यवस्थापन अधिक परिणामकारक करण्याच्या दृष्टिकोनातून, महत्वाच्या व अतिमहत्त्वाच्या व्यक्तींसाठी प्रस्तावित केलेल्या सुविधेबाबत महंत, पुजारी व भाविक भक्तांनी यासंदर्भात काही सूचना अथवा अभिप्राय असल्यास २६ मे पर्यंत संस्थानच्या अधिकृत ई-मेलवर . पाठवावेत.

## कंटेनरची मोटारसायकलला धडक; लाईनमनचा जागीच मृत्यू

आरंभ मराठी / धाराशिव

भरधाव कंटेनरने मोटारसायकलला जोराची धडक दिल्यामुळे या अपघातात लाईनमनचा जागीच मृत्यू झाल्याची घटना उपळे (मा.) येथील पुलावर झाला. यासंबधी सविस्तर वृत्त असे की, गणेश रम ेश पांचाळ (रा.माळुंब्रा सबस्टेशन ता. तुळजापूर) व सोबत रामचंद्र ठाकर हे दोघे दिनांक १६ मे रोजी रात्री नऊ वाजता मोटरसायकल वरुन एनएच ५२ रोडवर संभाजी नगर ते सोलापूर जाणाऱ्या उपळा (मा.) पुलावरून जात होते. दरम्यान कंटेनर (क्र जीजे १६ एवाय २९५१) चा चालक आरोपी राजेशपाल आत्मजा रामप्रसाद पाल (रा. बरहणपुर, शेषनपुर प्रतापगड वारी कला राज्य उत्तरप्रदेश) याने त्याच्या ताब्यातील कंटेनर हा हायगयी व निष्काळजीपणे चालवून गणेश पांचाळ यांच्या मोटरसायकलला धडक दिली. या अपघातात गणेश पांचाळ हे गंभीर जखमी होवून मयत झाले.

# आनंदाचा सोहळा; २८ वर्षांनी एकत्र आले विद्यार्थी, गुरुजनांचे आदरातिथ्य

आरंभ मराठी/धाराशिव

''छडी लागे छम छम, विद्या येई घम घम'' या ओळी आज खऱ्या अर्थाने साकार झाल्या. रुईभर येथील जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील १९९६-९७ सालच्या बॅचचे माजी विद्यार्थी तब्बल २८ वर्षांनंतर एकत्र आले आणि शालेय आठवणींना उजाळा दिला.या गेट-टुगेदर कार्यक्रमाची सुरुवात मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने झाली. माजी विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या हस्ते ''मानाची छडी'' स्वीकारून कार्यक्रमाचा शुभारंभ केला. त्यानंतर दीपप्रज्वलन व प्रतिमापूजन तसेच राष्ट्रगीत करून कार्यक्रमाचा धार्मिक आणि संस्कारी प्रारंभ करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर बालविकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आणि शिक्षण महर्षी सुभाष कोळगे यांनी भूषवले. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे त्या वेळचे सेक्रेटरी विठ्ठल पवार व १९९६-९७ च्या बॅचचे शिक्षक वर्ग नाईकवाडी जी. एन., श्री. पडवळ एस. एल., श्री. सातपुते व्ही. पी., श्री. भोईटे ए. के., श्री. बांगर जी. डी., श्री. भोजगुडे एस. डी., श्री. शिंदे बी. बी., श्री. सुतार जी. एम., श्री. राऊत आर. जी. आणि श्री. पडवळ डी. ए.,श्री.रायजदे सर.,क्षीरसागर हे मान्यवर उपस्थित होते.त्या काळी इयत्ता १०वी अ, ब असे एकूण तीन वर्ग होते आणि विद्यार्थी संख्या १५० इतकी होती. आज ६० हून अधिक माजी विद्यार्थी या कार्यक्रमाला उपस्थित राहून त्या आठवणींना उजाळा देण्यासाठी आले होते. कार्यक्रमात माजी विद्यार्थ्यांनी आपली कार्यक्षेत्रातील प्रगती, कौटुंबिक माहिती, तसेच आपल्या शाळेच्या आठवणी सादर केल्या. काही शिक्षकांनीही आपली मनोगते व्यक्त करत विद्यार्थ्यांची भरभराट पाहून आनंदाश्रू लपवू शकले नाहीत. शिक्षकांच्या नजरेतून झळकणारा अभिमान आणि प्रेम, उपस्थित प्रत्येकाच्या मनाला स्पर्शून गेला.



### शिक्षकांना भेटवस्तू

गुरूजनांच्या हस्ते पुन्हा एकदा छडीचा अनुभव घेण्याची संधी मिळाल्याने विद्यार्थी भावविवश झाले. अनेकांनी जुने प्रसंग, शिक्षकांचे मार्गदर्शन, शाळेतील खेळ अशा आठवणींना उजाळा देत आपली मनोगते व्यक्त केली. खरे तर गुरूचे ऋण फेडता येत नाहीत मात्र त्यांचा सन्मान म्हणून प्रत्येक शिक्षकां

### व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपवर संदेश

या गेट-टुगेदरची तयारी मागील तीन महिन्यांपासून सुरू होती. माजी विद्यार्थीसोशलमीडियाच्यामाध्यमातून,विशेषत:व्हॉट्सअ‍ॅपग्रुपवरून एकत्र आले. २८ वर्षांपूर्वी मोबाईल क्रांती नुकतीच सुरू झाली होती आणि त्याच क्रांतीमुळे सर्व माजी विद्यार्थी पुन्हा एकत्र येऊ शकले.

## पैलवान रविराज चव्हाण यांच्याकडून श्री तुळजाभवानी देवींच्या चरणी एक किलो चांदीची गदा अर्पण



आरंभ मराठी / तुळजापूर

आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू रविराज चव्हाण यांनी सोमवारी (दि.१९) कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी देवींचे दर्शन घेऊन देवींची ओटी भरत कुलधर्म कुलाचार करून देवींच्या चरणी एक किलो वजनाची चांदीची गदा अर्पण केली. रविराज चव्हाण हे आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू आहेत. त्यांनी तुर्की येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय कुस्तीस्पर्धेत सुवर्ण पदक पटकावले आहे. २३ वर्ष वयोगटातील राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेतही त्यांनी सुवर्ण पदक पटकावले होते. रविराज चव्हाण हे पंढरपूर येथील रहिवासी असून ते सोमवारी सहकुटुंब श्री तुळजाभवानी देवींच्या दर्शनाला आले होते. मंदिर संस्थानच्या वतीने पैलवान रविराज चव्हाण यांच्या कुटुंबीयांचा श्री तुळजाभवानी देवींची प्रतिमा भेट देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी जनसंपर्क अधिकारी दिनेश निकवाडे, सहायक सुरक्षा निरीक्षक श्रीकांत पवार, सहायक स्वच्छता निरीक्षक नितीन भोयर, लिपीक महेश गंजे, पुजारी अण्णासाहेब क्षीरसागर व मंदिर संस्थानचे कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

## मुरुम येथील जगन्नाथ गोशाळेत देशी गोमातेचे आगमन; श्रीमंत मातोळे यांचा सत्कार

आरंभ मराठी / मुरूम

मुरुम शहरातील जगन्नाथ गोशाळा येथे सोमवारी (दि. १९) एक विशेष धार्मिक आणि भावनिक प्रसंग घडून आला. सालेगाव (ता. लोहारा, जि. धाराशिव) येथील श्रीमंत अंबाजी मातोळे यांनी अतिशय वृद्ध आणि पुण्यश्लोक अशा देशी गोमातेचे गोशाळेला देणगी रूपाने सुपूर्द केले. याप्रसंगी संजय शेळके यांच्या हस्ते गोमातेचे पूजन करण्यात आले. यानंतर श्रीमंत मातोळे आणि त्यांचे सहकारी यांचा जगन्नाथ गोशाळा, मुरुम यांच्या वतीने औपचारिक सत्कार करण्यात आला. गोशाळेत सातत्याने होणारे गोमातेचे आगमन हे समाजातील श्रद्धा, सेवा आणि विश्वासाचे प्रतीक असल्याचे मत गोशाळा प्रशासनाच्या वतीने व्यक्त करण्यात आले. अशा सेवाभावी कार्यांमुळे गोसंवर्धन चळवळीला अधिक बळ मिळत आहे. यावेळी पंडित माने, सुरेश चव्हाण आदि उपस्थित होते जगन्नाथ गोशाळेच्या या उपक्रमाचे ग्रामस्थांनी आणि भाविकांनी कौतुक केले आहे.

## वीजपुरवठ्याच्या समस्येवर अ‍ॅड.शीतल चव्हाण फाउंडेशन आक्रमक

# एमएसईबी कार्यालयावर धडक,रिकाम्या खुर्चीला हार

आरंभ मराठी / उमरगा

उमरगा शहर व परिसरात सतत खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिक, शेतकरी आणि व्यापारी वर्ग त्रस्त झालेला असताना, या प्रश्नाकडे सरकार व महावितरणचे लक्ष वेधण्यासाठी अ‍ॅड. शीतल चव्हाण फाउंडेशनचे पदाधिकारी आक्रमक झाले आहेत. शनिवारी (ता.१७) रोजी फाउंडेशनने मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस, महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक, पालकमंत्री, आमदार व खासदार यांना निवेदन दिले होते. मात्र, समस्येचा काहीही ठोस तोडगा न निघाल्याने आज फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी थेट एमएसईबी (महावितरण) कार्यालयावर धडक दिली. कार्यालयात अधिकारी अनुपस्थित असल्यामुळे संतप्त पदाधिकाऱ्यांनी रिकाम्या खुर्चीला हार घालून निषेध व्यक्त केला. त्यानंतर कार्यालयात आलेल्या अधिकाऱ्यांना धारेवर धरून वीजपुरवठ्याच्या समस्यांवर कठोर शब्दांत जाब विचारण्यात आला. फाउंडेशनने दिनांक २२ मे २०२५ रोजी रुमणे मोर्चा



काढण्याचा इशारा दिला आहे. अधिकाऱ्यांनी पदाधिकाऱ्यांना समजावण्याचा प्रयत्न केला आणि काही तांत्रिक अडचणी सांगत ३० मे पर्यंतचा अवधी मागितला. या कालावधीमध्ये वीजपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिले आहे. या आंदोलनात मातोश्री शांताबाई चव्हाण, ऍड. अर्चना जाधव,



सत्यनारायण जाधव, ऍड. ख्वाजा शेख, राजू भालेराव, ज्योती माने, शबाना उडचणे, किशोर औरादे, प्रदीप मोरे, प्रदीप चौधरी, धानय्या स्वामी, करीम शेख, बबिता मदने, किशोर बसगुंडे आदी पदाधिकारी उपस्थित होते. उमरग्यातील जनतेच्या प्रश्नांवर आता फाउंडेशनच्या पुढाकारामुळे प्रशासनाची कसोटी लागणार आहे.

## जवळा येथे शिवराज्य पक्षाकडून टँकरने पाणीपुरवठा



आरंभ मराठी / जवळा

परंडा तालुक्यातील जवळा (नि.) येथे पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. मे महिना संपत आला तरी ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी रानावनात भटकंती करावी लागत आहे. या पार्श्वभूमीवर जवळा येथील स्वराज्य पक्षाच्या वतीने गावकऱ्यांसाठी टँकरने पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे.टँकर स्वराज्य पक्षाचे तालुकाध्यक्ष आश्रु कातुरे, तालुका सचिव विकास रोडे, अमोल कातुरे,महावीर सांगडे, श्रीकांत गवारे,शिवराम राऊत,बाबासाहेब सांगाडे, रोहित कातुरे, तुषार दळवे,आसिफ शेख, सोहेल खल्ली, महेश कातुरे, महेश गवारे, जगदीश गवारे, गोकुळ गवारे, गौतम खैरे आदींच्या उपस्थितीत टँकर सुरू करण्यात आला. यावेळी गावातील विशेषतः महिलांनी शिवराज्यच्या पदाधिकाऱ्यांचे आभार मानले.

### ग्रामपंचायतने पाणीपुरवठा केला नाही म्हणून आमचा पुढाकार

जवळ्याची पिण्याची पाण्याची टंचाई असल्याने आम्ही ग्रामपंचायतला वारंवार टँकरची मागणी करून देखील ग्रामपंचायतने पिण्याच्या पाण्याची सोय लावली नाही. म्हणून आम्ही सर्वांनी स्वखर्चाने स्वराज्य संघटनेच्या वतीने गावात मोफत टँकरद्वारे मोफत पाणी वाटप केले.

–अश्रू कातुरे, स्वराज्य पक्ष, तालुकाध्यक्ष,

### बोअर अधिग्रहित केले,

आम्ही ग्रामपंचायतने एक बोअर अधिग्रहण केले आहे.उन्हाळ्यामुळे पिण्याच्या पाणी शॉर्टेज असल्यामुळे नळाला येत नाही.आवश्यकता असेल तर आणखी एखादे बोअर अधिग्रहित करणार आहोत.

– संतोष गुळमेरे,
ग्रामविकास अधिकारी,जवळा

## कोरेगाववाडी येथील शिवाई इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंगमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

आरंभ मराठी / उमरगा

शिवाईइन्स्टिट्यूटऑफनर्सिंगकोरेगाववाडी, उमरगा येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. यावेळी अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष बी.एच. बेडदुर्गे होते. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव डॉ.विजय बेडदुर्गे संस्थेचे, उपाध्यक्ष प्रा.अजय बेडदुर्गे उपस्थित होते. विद्यापीठा अंतर्गत घेण्यात आलेली हिवाळी परीक्षा २०२४ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्तुंग यश संपादन केले. बी.एस्सी. नर्सिंग प्रथम वर्षातील अमोगसिद्ध व्हनमाने (७७.६%), समीक्षा सोनटक्के (७५.२%), वैष्णवी सागर (७२.८%) तसेच द्वितीय वर्षातील प्रसाद हंगे (७७.७१%), बालाजी केंद्रे (७६.५७%), विश्वजीत पांचाळ (७५.४२%) व तृतीय वर्षातील मोनाली ननावरे (७८%), शुभांगी आंबीलगे (७७.३३%), अंकिता सिरसाट (७७.३३%) व नूतन वालदे (७७%) असे यश संपादन केले. सर्व प्रमुख पाहुण्यांच्या



हस्ते सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी सतत सराव, मेहनत, वाचन, अभ्यासामध्ये सातत्य ठेवणे गरजेचे असल्याचे डॉ. विजय बेडदुर्गे यांनी विदयार्थ्यांना सांगितले. संस्थेचे अध्यक्ष बी.एच.बेडदुर्गे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी महाविद्यालयातील शिक्षक वर्ग प्रशांत वाघमारे, शुभम सूर्यवंशी, प्रियंका राठोड, अविनाश चौधरी, अभिजीत पाटील, शहाबाज शेख, औदुंबर जाधवर, अविनाश कुंभार, शुभांगी बंदीचोडे, मोनिका धुरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मोनिका धुरे यांनी केले व आभार प्रदर्शन अभिजीत पाटील यांनी केले.

## डॉ.भीमराव यशवंतराव आंबेडकर यांचे मत,बौद्ध धम्म परिषदेस प्रतिसाद

# देशाचा इतिहास बौद्धांनी लिहिला मात्र बौद्ध लेण्या,विहारांवर कब्जा इतरांचा

आरंभ मराठी/धाराशिव

भारत देशाची निर्मिती बौद्धांनी केली आहे. त्यानंतर भगवान महावीर यांनी जैन यांनी देखील धर्माचा प्रचार केला. मात्र तथागत गौतम बुद्धांचा प्रभाव इतका होता की जैन धर्म बाजूला गेला. या देशाचा इतिहास ह्युयान यासह तीन बौद्ध यात्रेकरूंनी लिहिला आहे. सम्राट अशोकाने प्रत्येक बौद्ध स्थळांना भेटी देऊन त्याचा नकाशा बनविला होता. ब्रिटिशांनी त्या नकाशाच्या आधारे बुद्ध विहारी व लेण्या शोधून काढून त्या जगासमोर आणल्या आहेत. मात्र या बौद्धांच्या विहारे व लेण्यांवर ज्या लोकांनी काहीही निर्माण न करता केवळ पूजापाठ केली, यज्ञात पशूंची हत्या केली, त्यांनी कब्जा घेतला असल्याचा आरोप भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तथा समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ भीमराव यशवंतराव आंबेडकर यांनी केला.शहरातील नगर परिषदेच्या छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात आयोजित भारतीय बौध्द महासभेच्यावतीने भव्य बौध्द धम्म परिषदेत ते बोलत होते. यावेळी धम्म परिषदेच्या अध्यक्षस्थानी धाराशिव जिल्हाध्यक्षा राजश्री कदम प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय उपाध्यक्ष अ‍ॅड. एस.के. भंडारे, महाराष्ट्र अध्यक्ष यु.जी. बोराडे, राज्य सरचिटणीस अशोक केदारे, सोलापूरचे जिल्हाध्यक्ष आण्णासाहेब वाघमारे, नागसेन माने, हणमंत प्रतापे, अ‍ॅड. दिलीप निकाळजे, अ‍ॅड. किशोर पायाळे, भिक्खु संघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष भन्ते महावीरो थेरो, भिक्खु संघाचे सदस्य सारिपुत्त थेरो, तगर भूमीचे संस्थापक अध्यक्ष भन्ते सुमेधजी नागसेन आदींची प्रमुख उपस्थिती होती. 'बौध्दगया महाबोधी महाविहार आणि प्राचीन बौध्द तीर्थक्षेत्रे इतिहास व सद्यस्थिती' या विषयावर बोलताना डॉ.



यशवंतराव आंबेडकर म्हणाले की, बौद्धांचा इतिहास सांगितला जात नाही. कारण ओबीसी समाजाचे लोक पुन्हा बौद्ध बनतील अशी भीती येथील प्रस्थापितांना असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच महाबोधी विहार ब्राह्मणांच्या ताब्यातून मुक्त करावे यासाठी गेल्या ९५ दिवसांपासून महाबोधी विहार येथे आंदोलन सुरू आहे. तिकडे मीडिया साधा फिरकला देखील नाही. तसेच केंद्र व राज्य सरकार देखील त्याकडे दुर्लक्ष करीत आहे. त्या विहाराचे ऐतिहासिक पुरावे असताना देखील ते ताब्यात दिले जात नाही. तर, उलट अयोध्या येथील राम मंदिराचे कुठलेही पुरावे नस ताना व खोदकामामध्ये तथागत गौतम बुद्ध व सम्राट अशोक यांचे ऐतिहासिक शिल्प सापडलेली असताना देखील बहुसंख्यांकाच्या बळावर त्या ठिकाणी राम मंदिर बांधले असल्याचे सांगत जाती धर्माला बघून न्याय दिला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. विदेशातील पर्यटकांपैकी ७० टक्के पर्यटक हे बौद्ध वास्तू पाहण्यासाठी येतात. सांचीचा स्तूप सम्राट अशोकाने एक दगड दुसऱ्या दगडाला लॉक पद्धतीने बांधकाम करून निर्माण केला असून तो कसा बांधला ? हे पाहून ते आश्चर्य चकित होत असल्याचे त्यांनी सांगितले.



### धाराशिव शहरात भव्य रॅली

या धम्मपरिषदेनिमित्त भीमनगर येथील बुद्ध विहारातून महामानवास अभिवादन करून क्रांती चौकातून धम्म रॅली व पथ संचलन करण्यात आले. ही रॅली मारवाडी गल्ली, काळा मारुती चौक, पोस्ट ऑफिस, त्रिशरण चौक, अंबाला हॉटेल चौक, छत्रपती संभाजी महाराज चौक, संत गाडगेबाबा महाराज चौक, महात्मा फुले चौक, डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक व छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे नाट्यगृहात या रॅलीचा समारोप करण्यात आला.

## अल्पवयीन मुलीच्या लग्नाची तयारी; मंडपातच कारवाई

### अल्पवयीन मुलीचा बालविवाह रोखण्यात यश; पालकांचे केले समुपदेशन

आरंभ मराठी / धाराशिव

बालविवाह करणे कायद्याने गुन्हा असला तरी त्याची गय न करता काही लोक बालविवाहाचा घाट घालतात. परंतु, चाईल्ड हेल्पलाईन १०९८ द्वारे कित्येक बालविवाह रोखण्यात प्रशासनाला यश आले आहे. लग्न मंडप टाकून लग्नाची संपूर्ण तयारी झाली, नवरा-नवरी, पै-पाहुणे आणि भटजीही आले मंगलाष्टका होणार तितक्यात चाईल्ड हेल्पलाईनवर बालविवाहाची तक्रार येते आणि प्रशासनाकडून त्याची तात्काळ दखल घेत तो बालविवाह रोखला जातो. ही घटना शनिवारी (दि.१७) धाराशिव शहरातील रायगड फंक्शन हॉल येथे घडली. रायगड हॉल येथे एका अल्पवयीन मुलीचा विवाह केला जात असल्याची बातमी चाईल्ड हेल्प लाईनवर समजली होती. या माहितीच्या आधारे गतिमान पाऊले उचलून संबंधितांना कायदा समजावून सांगत एका अल्पवयीन मुलीचा विवाह थांबविण्यात यश आले. अल्पवयीन मुलगी कर्जत ता. अंबड जिल्हा जालना येथील होती. तर मुलगा धाराशिव तालुक्यातील गावसुद येथील असल्याचे समजते. चाईल्ड हेल्प लाईन १०९८ टोल फ्री नंबर वर तक्रार येताच धाराशिव तालुक्यातील बालविवाह रोखण्यात प्रशासनाला यश आले. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी किशोर गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली परिवक्षा अधिकारी व्यंकट देवकर, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अमोल कोवे व जिल्हा समन्वयक विकास चव्हाण यांच्या टीमने धाराशिव शहरातील रायगड फंक्शन हॉल येथील नियोजित बालविवाह रोखला. यावेळी बाल संरक्षण कक्षाच्या कोमल धनवडे (समुपदेशक) जयश्री पाटील (क्षेत्रीय कार्यकर्ते) तसेच चाईल्ड हेल्प लाईन कक्षातील रविराज राऊत (केस वर्कर), योगेश माने (केस वर्कर), कांबळे, सुपरवायजर, अंगणवाडी सेविका यांच्या टीमने पोलिसांना सोबत घेऊन ही कारवाई केली. टीमने प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन बाल विवाह रोखला शिवाय पालकांचे समुपदेशन केले व हमीपत्र लिहून घेतले.

# एक एकर फुलकोबीतून तीन लाखांचे विक्रमी उत्पन्न

## पळसप येथील तरुण शेतकरी महादेव नरवडे यांचा फुलकोबी पिकाचा यशस्वी प्रयोग

### सुयोग्य नियोजनातून दोन महिन्यातच कमावला नफा

रमेश नरवडे/आरंभ मराठी

**पळसप–पारंपरिक पिके घेताना अनेक वेळा उत्पादन खर्चही निघत नसल्याने पारंपरिक शेतीला बगल काही शेतकरी आपल्या शेतीत नवनवीन प्रयोग करून फायद्याची शेती करण्याचा प्रयत्न करतात. त्यात कित्येक वेळा यश मिळते तर काही वेळा अपयश पदरी पडते. परंतु, बाजाराची स्थिती, बाजारभावाचा अभ्यास आणि पिकाचे योग्य व्यवस्थापन केल्यास कमी कालावधीत देखील शेतीतून नफा कमावता येतो हे पळसप येथील तरुण शेतकऱ्याने दाखवून दिले आहे. पळसप येथील महादेव नरवडे यांनी फुलकोबी पिकातून तीन लाखांचा नफा कमावला आहे.**





धाराशिव तालुक्यातील पळसप येथील तरुण शेतकरी महादेव नानासाहेब नरवडे यांनी बाजारपेठेचा अंदाज घेऊन आपल्या एक एकर क्षेत्रावर वेलकम सिड्सच्या फुलकोबीच्या ७६४ या व्हरायटीची पंचवीस हजार रोपे १० मार्च दरम्यान लागवड केली. पिकाची व्यवस्थीत काळजी घेत, खुरपणी वेळच्या वेळेला पाणी व्यवस्थापन, खत व्यवस्थापन, आणि रोगराईसाठी वेळच्या वेळेला फवारणी या पद्धतीने फुलकोबी पिकाचे संगोपन करून उन्हाची तीव्रता असतानाही त्यांनी आपल्या कष्टाच्या जोरावर पीक अतिशय दर्जेदार आणले आहे. आलेले पीक सद्या त्यांनी कळंब येथील व्यापारी यांना ३० रु किलो प्रमाणे शेतातूनच विक्री केले आहे. आतापर्यंत ५ टन माल काढला असून, आणखी ४ ते ५ टन माल निघेल अशी अपेक्षा आहे. या पिकाच्या माध्यमातून त्यांना आतपर्यंत दीड लाख रुपये उत्पन्न मिळवले आहे. राहिलेल्या उत्पादनातून आणखी दिड लाख रु उत्पन्न त्यांना मिळणार आहे. त्यांना एक एकर शेतामध्ये दोन महिन्यात तीन लाख रुपये उत्पन्न मिळणार असल्याने ते समाधानी असल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात आले. त्यांची पळसप येथे स्वत:ची भाजीपाला नर्सरी असल्याने रोपाची विक्री कोणत्या वेळेस कमी जास्त झाली, कोणत्या पिकाला भाव मिळू शकतो याचा अंदाज घेऊन त्यांनी या पिकाची लागवड केली होती. बाजारपेठेत फुलकोबीची मागणी वाढल्याने ही शेती यशस्वी झाल्याचे दिसते. इतर तरुण शेतकऱ्यांनीही बाजारपेठेचा अंदाज घेऊन आपल्या शेतामध्ये नवनवीन प्रयोग करावे असे नरवडे यांच्याकडून सांगण्यात आले.

# मदरसा दावुतुल उलूमच्या विद्यार्थ्यांचे १० वी, १२ वी परीक्षेत यश



आरंभ मराठी/ धाराशिव

येथील मदरसा दावुतुल उलूम बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या अंतर्गत साराह हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, मोतीवाला इंग्लिश स्कूलने माध्यमिक (१० वी) व उच्च माध्यमिक (१२ वी) विज्ञान शाखेच्या परीक्षेत १००% निकालाची उज्वल परंपरा कायम राखली आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे, प्राचार्यांचे आणि संस्थेच्या वतीने मन:पूर्वक अभिनंदन करण्यात आले.मदरसा दावुतुल उलूम संस्थेचे प्रमुख रसुल शेख अलिम शेख, सचिव पेंगंबर काझी, शाळा समितीचे अध्यक्ष नबी शेख यांच्यासह संस्थेचे अध्यक्ष आणि हायस्कूलचे सुपरवायझर बाबा फैजुद्दीन, प्राचार्य सरफराज पटेल, तसेच हायस्कूलचे मुख्याध्यापक शाहनूर पठाण व सर्व विषय शिक्षकांचे परिसरात विशेष कौतुक होत आहे.

# भाजपा जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांची मुरुम येथे सदिच्छा भेट

## उद्योग आघाडीचे जिल्हाध्यक्ष श्रीकांत मिणियार यांच्या निवासस्थानी स्वागत

आरंभ मराठी/मरूम

धाराशिव जिल्ह्याचे नव्याने नियुक्त झालेले भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी शुक्रवारी (ता. १६) मुरुम शहरातील भाजपा व्यापारी आघाडीचे जिल्हाध्यक्ष श्रीकांत (राजू) मिणियार यांच्या किशन निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. या प्रसंगी मिणियार परिवाराच्या वतीने कुलकर्णी यांचा यथोचित सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. या भेटीदरम्यान जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी मुरूम शहरातील भाजपा कार्याचा सविस्तर आढावा घेतला. पक्ष संघटनेच्या बळकटीसाठी श्रीकांत मिणियार यांच्या नेतृत्वाखाली शहरातील पदाधिकारी आणि कार्यकर्ते करत असलेल्या कार्याचे त्यांनी कौतुक केले. पक्षाच्या विचारसरणीला तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे आणि संघटना अधिक बळकट करण्याचे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले. याप्रसंगी श्रीकांत मिणियार यांनी कुलकर्णी यांच्या संघटनात्मक कौशल्याचे विशेष अभिनंदन करत त्यांना पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते आणि कार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. यामध्ये दत्ताभाऊ राजमाने, विजय शिंगाडे, शितल पाटील, मुरूम शहराध्यक्ष गुलाबजी डोंगरे, अरविंद फुगटे, सरपंच अनिताताई जाधव, युवा मोर्चा शहराध्यक्ष सिद्धलिंग हिरेमठ, जिल्हा सचिव आकाश क्षीरसागर, महिला मोर्चा शहराध्यक्षा शोभाताई बेगमपुरे, मनीष ब्याळे, महेश धुमुरे, गोविंद मिणियार, कृ.ऊ.बा. समिती संचालक शिवाजी दूधभाते, तालुका सरचिटणीस सागर पाटील यांच्यासह अनेक बूथ प्रमुख आणि भाजपा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सदिच्छा भेटीमुळे मुरुम शहरात नवीन राजकीय उर्जा निर्माण झाली असून पक्षाच्या संघटनात्मक मजबुतीसाठी ही भेट निश्चितच प्रभावी ठरणार आहे.



# साहित्य भारत कथा स्पर्धेचा निकाल जाहीर

आरंभ मराठी/ धाराशिव

अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारतीच्या वतीने एकत्र 'कुटुंब पद्धतीचे महत्त्व' या विषयावर कथा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा तीन गटात घेण्यात आली होती. त्यात इयत्ता नववी ते बारावी या गटात अल्फिया शेख प्रथम तर अनुष्का माळी द्वितीय क्रमांक पटकावला. वय वर्षे ४० पर्यंतच्या गटात स्मिता पाटोळे यांनी प्रथम तर दिपाली घेट्टे यांना द्वितीय क्रमांक प्राप्त झाला, आणि वय वर्षे ४० च्या पुढील गटात कल्याणी तांबे यांनी प्रथम क्रमांक तर सुवर्णा शिनगारे यांना द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. साहित्य भारती तर्फे या कथा स्पर्धेचे आयोजन डॉ नागेश अंकुश व दिपाली कुलकर्णी यांनी केले होते,तर धाराशिव जिल्हा स्तरावर युवराज नळे यांनी संयोजक म्हणून काम पाहिले होते. सर्व कथा स्पर्धेच्या विजेत्यांना लवकरच प्रमाणपत्र व ग्रंथ देऊन समारंभपूर्वक गौरवण्यात येणारआहे.




# छत्रपती संभाजीराजे जन्मोत्सव समितीच्या रक्तदान शिबिराला अभूतपूर्व प्रतिसाद

## मुरुमच्या इतिहासात मोठे रक्तदान शिबिर; १२६ तरुणांनी केले रक्तदान

आरंभ मराठी / मुरूम

मुरुम शहरातील छत्रपती संभाजीराजे जन्मोत्सव समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिराला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. तब्बल १२६ नागरिकांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करत सामाजिक बांधिलकी जपली असून, हे शिबिर मुरुम शहराच्या इतिहासातील सर्वात मोठे रक्तदान शिबिर ठरले आहे. प्रत्येक वर्षी छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम राबवणाऱ्या छत्रपती संभाजीराजे ग्रुपने यंदा भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिराचे उद्घाटन समितीचे अध्यक्ष सचिन शिंदे यांच्या हस्ते सकाळी १० वाजता करण्यात आले. संध्याकाळी ८ वाजेपर्यंत चाललेल्या या शिबिरात युवक, महिला व ज्येष्ठ नागरिकांचा उल्लेखनीय सहभाग होता. या उपक्रमाचे उत्कृष्ट नियोजन समितीचे अध्यक्ष सचिन शिंदे, उपाध्यक्ष ज्योतिबा शिंदे आणि सदस्य आकाश शिंदे, सागर जगदाळे, वैभव भोसले, अक्षय दाजी शिंदे, सुमित पांढरे, सुमित शेळके, विशाल व्हनाळे, सतीश जाधव, रतन मुडे, मल्लू तडकले, शिवराज गिरीबा, गणेश जगदाळे, अभी सूर्यवंशी, बालाजी देशमुख, प्रदीप शिंदे, मंगेश शिंदे, दादा मुदकां, मोन्या व बंटी राजपूत, पवन जाधव, शुभम (पप्पू) शिंदे आणि इतर कार्यकर्त्यांनी एकजुटीने केले. या ऐतिहासिक शिबिरामुळे छत्रपती संभाजीराजे ग्रुपचे कार्य संपूर्ण शहरात कौतुकास पात्र ठरत आहे. समाजासाठी उपयोगी उपक्रम राबवून जयंती साजरी करण्याचा आदर्श या माध्यमातून पुढे आला असून, 'रक्तदान हे श्रेष्ठ दान' ही संकल्पना समितीने कृतीतून सिद्ध केली आहे.



# जाणता राजा युवा मंचतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

आरंभ मराठी / तुळजापूर

जाणता राजा युवा मंच व जय भवानी तरुण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने दहावी व बारावी बोर्ड परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा घेण्यात आला. याप्रसंगी आर्य चौक येथे जाणता राजा युवा मंच व जय भवानी तरुण मंडळ संपर्क कार्यालयाचे अमोल कुतवळ, ऋषिकेश मगर, भारत कदम, शाम पवार, नरेश पेंदे, रणजीत इंगळे, आनंद जगताप, राहुल खपले, अक्षय कदम, बालाजी तट आदींच्या उपस्थित उद्घाटन करण्यात आले. जाणता राजा युवा मंचतर्फे सुदर्शन वाघमारे यांनी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विवेक कोरे यांनी केले. विद्यार्थ्यांमधून भक्ती घाटशीळे व अयाना अमोल नाईक यांनी केलेल्या सत्काराबद्दल आभार व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महेश पुजारी, ॲड.शुभम खोले, राजाभाऊ चोपदार ,प्रसाद प्रयाग, स्वप्निल पाठक,सोमनाथ मस्के,अनमोल साळुंके आदींनी परिश्रम घेतले.




# समता माध्यमिक विद्यालयाचा दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल ९४ टक्के

आरंभ मराठी/ धाराशिव

धाराशिव शहरातील शिक्षक कॉलनीमधील समता माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल ९४ टक्के लागला असून, एकूण ९६ विद्यार्थी परीक्षेला बसलेले होते. यापैकी विशेष प्राविण्यासह २८ विद्यार्थी उत्तीर्ण असून प्रथम श्रेणीमध्ये २९ विद्यार्थी उत्तीर्ण आहेत. विद्यालयातून प्रथम कु.दारफळकर नारायणी – ९९.२० % द्वितीय कु. चव्हाण प्रतीक्षा ९३% तृतीय कु. चव्हाण श्रद्धा –९१.६०% घेऊन उत्तीर्ण झालेल्या आहेत. गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष एन. आर. सोनार, संस्थेचे उपाध्यक्ष एम. आर .एडके, सचिव एस .एस .वाघमोडे तसेच सर्व संस्थाचालक, मुख्याध्यापिका श्रीमती एस.एम. एडके व शिक्षक वृंद यांनी केले.

# मेंढा येथे छत्रपती शंभूराजे यांची जयंती उत्साहात साजरी

आरंभ मराठी / तेर

धाराशिव तालुक्यातील मेंढा येथे छत्रपती शंभूराजे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी पुणे येथील बजरंग दलाच्या अध्यक्षा हर्षदा ठाकूर यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. शनिवारी (दि.१७) सायंकाळी शंभू राजे यांच्या प्रतिमेची मिरवणूक गावातून काढण्यात आली. शंभुराजे की जय, छत्रपती शिवाजी महाराज की जय,या घोषणेने तरुणाईने मोठा जल्लोष केला. मिरवणूकीत घुगी, समुद्रवाणी, लासोना, पाडोळी, येथून तरुण सहभागी झाले होते. बेंबळी पोलीस स्टेशन ने चोख बंदोबस्त ठेवला होता. स. पो. नि. गणेश पाटील, पाडोळी दूरक्षेत्रचे अंमलदार नवनाथ बांगर, गणेश वाघमोडे, गोपाल सोमवंशी, पोलीस पाटील योगेश माळी सरपंच नामदेव माळी हे उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराज व संभाजी राजे यांच्या आरतीने मिरवणुकीचे विसर्जन विठ्ठल मंदिरासमोर करण्यात आले. शंभुराजे प्रतिष्ठानचे अध्यक्ष धीरज ढोरमारे, उपाध्यक्ष किरण पवार, सचिव ओंकार, जावळे ,सुरज चव्हाण, सत्यम जावळे यांच्यासह तरूणांनी मिरवणुकीत शांतता राखण्यासाठी मोलाचे सहकार्य केले.

# मराठा सेवा संघ, रेवापुरी चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

आरंभ मराठी / मुरूम

मुरुम शहरातील किसान चौक येथील जोडलिंगेश्वर महादेव मंदिर सभागृहात शनिवारी (ता.१७) मराठा सेवा संघ व रेवापुरी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने इयत्ता दहावी व बारावी २०२५ बोर्ड परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गौरव समारंभ संपन्न झाला. या कार्यक्रमात सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा मराठमोळ्या रुबाबदार फेट्याने, पुष्पहार घालून, सन्मानचिन्ह, गौरव प्रमाणपत्र व विविध महापुरुषांचे चरित्रग्रंथ साहित्य देत सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी रेवापुरी चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष तथा माजी प्राचार्य दत्तात्रय इंगळे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून मुरुम पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक डी.डी. गव्हाणे, गुरुकुल प्रायमरी स्कूलच्या संचालिका मयुरी चौधरी, ट्रस्टचे उपाध्यक्ष तानाजी फुगटे, माजी सैनिक व्यंकट चौधरी, युवा सेना जिल्हा उपाध्यक्ष भगत माळी, पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नहीरपाशा मासूलदार तसेच नागालँड येथे शिक्षक म्हणून कार्यरत असलेले लक्ष्मण शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात शहीद भगतसिंह यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली. इंगोले गल्ली, सुभाष चौक, किसान चौक, माळी गल्ली, सय्यदा गल्ली या भागांतील दहावी–बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा यात समावेश होता. यापैकी मुरुम शहरांत प्रथम येणारी किसान चौक येथील विद्यार्थिनी गायत्री इंगळे हिला ९७.२०% गुण मिळवल्याबद्दल विशेष सन्मान करण्यात आला.यावेळी पीएसआय डी.डी. गव्हाणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, ''फक्त गुण महत्त्वाचे नसून आपल्या कर्तबगारीने, व्यक्तिमत्त्वाने आणि संस्कारांनी विद्यार्थ्यांनी स्वत:ची ओळख घडवली पाहिजे. गुण हे यशाचे एक अंग आहे, पण खरे यश म्हणजे चांगला माणूस होणे हेच आहे.'' या प्रेरणादायी मनोगतातून त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये आत्मभान आणि सामाजिक जाणीवेची चेतना जागृत केली. त्यानंतर माजी प्राचार्य दत्ता इंगळे यांनी अध्यक्षीय समारोप करत विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस सदिच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक मोहन जाधव यांनी केले, तर आभार प्रदर्शन मराठा सेवा संघाचे शहराध्यक्ष श्रीधर इंगळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मराठा सेवा संघाचे तालुका उपाध्यक्ष संजय सावंत, श्रीधर इंगळे, मोहन जाधव, तय्युम दफेदार, शफिक जेवळे, संदीप बाबळसुरे, आकाश जाधव, गोविंद टेकाळे यांनी मोलाचे सहकार्य केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.





शिवराज दिवटे प्रकरणाने संतापाचा विस्फोट

# परळी घटनेच्या निषेधार्थ मोहा ग्रामस्थांचा कडकडीत बंद

आरंभ मराठी/मोहा

बीड जिल्ह्यातील परळी येथे शिवराज दिवटे या तरुणावर झालेल्या बेदम मारहाणीच्या निषेधार्थ मोहा गावातील ग्रामस्थांनी रविवारी (दि.१८) कडकडीत बंदची हाक दिली. या बंदला ग्रामस्थांनी उत्स्फूर्त पाठिंबा दिला असून, गावातील सर्व दुकाने, वाहतूक आणि दैनंदिन व्यवहार ठप्प राहिले.

परळीतील वाढत्या गुन्हेगारी घटनांनी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्येचा आणखी तपास सुरू असताना, तोच आणखी एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. परळी तालुक्यात शिवराज दिवटे या तरुणाला दहा–बारा जणांच्या टोळक्याने बेदम मारहाण केली. मारहाणीनंतर त्याचे अपहरण करण्याचा प्रयत्नही झाल्याचा आरोप आहे. या घटनेचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले असून, आरोपींनी ''तुला सोडणार नाही, याचा संतोष देशमुख पार्ट टू करू'' अशी धमकी दिल्याचा दावा पीडिताने केला आहे. या प्रकरणामुळे परिसरात प्रचंड संतापाचे वातावरण असून, दोषींवर कठोर कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे. गावातील तरुण, महिला, सामाजिक कार्यकर्ते आणि व्यापाऱ्यांनी एकजूट दाखवत निषेध आंदोलनात सहभाग घेतला. ''आज जर आवाज उठवला नाही, तर उद्या प्रत्येक गावात अशा घटना घडतील. आरोपींना तात्काळ अटक करून कठोर शिक्षा झाली पाहिजे,'' अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.



### आरोपीची नग्न धिंढ काढून मोक्का लावा

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख प्रकरणाच्या आरोपींना व्हीआयपी सुविधा मिळत असल्यामुळे गुन्हेगारांना कायद्याचा धाक राहिलेला नाही. तरी सरकारने अशा प्रवृत्तीचे लोक जागीच ठेचून गुन्हेगारी संपुष्टात आणावी. त्यासाठी शिवराज दिवटे तरुणाला मारहाण करणाऱ्या आरोपींची नग्न धिंड काढून आरोपींवर मोक्का लावण्यात यावा.

– विजयानंद मडके,
सामाजिक कार्यकर्ते

CMYK

04

www.arambhmarathi.com

दैनिक आरंभ मराठी

आपलं धाराशिव....

मंगळवार दि.20 मे 2025

# धाराशिव जिल्ह्यातील वृत्तपत्र विक्रेत्यांच्या संपाला प्रतिसाद

## वृत्तपत्र वाचकांचीही भावना,विक्रेत्यांना चांगला मोबदला मिळायला हवा

आरंभ मरंठी/ तुळजापूर

राज्यासह देशभरात कानाकोपऱ्यात लोकांपर्यंत बातम्या पोहोचवण्याचे काम करणारा वृत्तपत्र विक्रेता हा या व्यवसायातील कायमच दुर्लक्षित घटक राहिला आहे. सध्याच्या महागाईच्या काळात अत्यंत कमी कमिशनवर काम करणाऱ्या वृत्तपत्र विक्रेत्यांनी आपल्या अनेक मागण्या वृत्तपत्र व्यवस्थापनासमोर गेल्या काही वर्षापासून मांडलेल्या आहेत. मात्र त्यामध्ये कोणतीही दखल घेतली नसल्याने रविवारी सोलापूर व धाराशिव या दोन जिल्ह्यातील वृत्तपत्र विक्रेत्यांनी एक दिवसीय बंद करत वृत्तपत्र विक्री थांबवली होती. या बंदमुळे दोन्ही जिल्ह्यातील वितरण व्यवस्था पूर्णपणे मोडकळून पडली होती.



थंडी पाऊस वारा याची तमा न बाळगता वृत्तपत्र विक्रेता वर्षभर वाचकांना सेवा देत असतो वर्षभरात जेमतेम पाच ते सहा सुट्ट्या वृत्तपत्र विक्रेत्यांना मिळत असतात त्यामुळे कौटुंबिक सोहळे तसेच इतर समारंभासाठी त्यांना वेळ काढता येत नाही. मात्र तरीही कोणती तक्रार न करता ते आपलं काम इमान ईतबारे करत असतात. दरम्यान सध्या महागाईच्या काळात वृत्तपत्रांच्या किमती मात्र आहे तश्याच आहेत. त्यामुळे वृत्तपत्र विक्रेत्यांचे आर्थिक उत्पन्नही आहे तेवढेच दिसत आहे. कोरोना काळानंतर वृत्तपत्राच्या विक्रीमध्ये मोठी घट झाली होती. त्यामुळे आपोआपच विक्रेत्यांच्या उत्पन्नामध्येही घट झाली आहे त्यामुळे आर्थिक नियोजन करताना त्यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. यासाठी त्यांनी व्यवस्थापनाकडे अंकाची किंमत वाढ तसेच कमिशन वाढीची मागणी केली आहे. मात्र कुठल्याही व्यवस्थापनाने त्याची दखल न घेतल्याने वृत्तपत्र विक्रेत्यांनी हे बंद आंदोलन केले आहे. आगामी काळात मागण्या मान्य न झाल्यास हे आंदोलन आणखी तीव्र करण्याचे ही वृत्तपत्र विक्रेता संघटनेकडून सांगण्यात आले आहे.

### चहा १० रुपयांना, वृत्तपत्र ५ रुपयांत

आजच्या महागाईच्या काळात जिथे चहाची किंमत दहा रुपये आहे तिथे वृत्तपत्रे अजूनही पाच रुपयांमध्ये विकली जातात त्यामुळे वृत्तपत्राची किंमत बरोबरच विक्रेत्यांचा मोबदलाही वाढवून मिळाला पाहिजे.
–महेश इंगळे, वाचक उमरगा

एकीकडे सगळ्या वस्तूंची किंमत मोठ्या प्रमाणावर वाढत आहेत पाण्याची बाटली देखील वीस रुपये किमतीत विकली जाते तिथे वृत्तपत्राची किंमत अत्यंत कमी आहे तर वृत्तपत्रे घरापर्यंत पोहोचवणारे वृत्तपत्र विक्रेत्यांचे कष्टही खूप मोठे असल्याने त्यांना योग्य मोबदला देणे गरजेचे आहे.
–गोविंद साळुंखे वाचक उमरगा .

### वृत्तपत्र विक्रेत्यांना मोबदला मिळावा

सकाळी चहा बरोबर वर्तमानपत्र लागतेच मात्र ते वर्तमानपत्र वेळेत पोच करण्याचे काम हे वृत्तपत्र विक्रेते करत असतात गेली कित्येक वर्षे मी वर्तमानपत्र वाचत असून, त्यासाठी महत्त्वाचं योगदान असणाऱ्या वृत्तपत्र विक्रेत्यांना त्यांचा मोबदला हा मिळालाच पाहिजे.
– धनंजय पाटील, वाचक, तुळजापूर .

### व्यवस्थापनाने लक्ष द्यावे

थंडी असो की पाऊस ठरलेल्या वेळी वृत्तपत्र येणारच कधीही सुट्टी न घेता ते ही सेवा ते देतात. मात्र, त्यांना मिळणारे उत्पन्न हे परवडणारे नाही. त्यामुळे त्यांच्या मागण्या मान्य करून त्यांना योग्य मोबदला व्यवस्थापनाने दिलाच पाहिजे.
–प्रदीप पैलवान, वाचक, तुळजापूर

### वृत्तपत्र विक्रेत्यांच्याआरोग्याचा विचार व्हावा

वारा पाऊस थंडी कशाचा विचार न करता १२ ही महिने वृत्तपत्र विक्रेता प्रत्येक गावामध्ये शहरांमध्ये घरोघरी सर्वांना वृत्तपत्र पोहोच करत असतो, अशा वृत्तपत्र विक्रेत्यासाठी प्रशासनाने त्यांच्या आरोग्याचा विचार करून त्यांना आरोग्य सुविधा तसेच इतर सुविधा पुरवणे गरजेचे आहे.
–प्रल्हाद आडागळे, विधानसभा प्रमुख, परांडा, शिवसेना(उबाठा).

# विद्युत पुरवठा सतत खंडित होत असल्याने उमरगा येथील नागरिकांचे हाल

## शिवसेन(उबाठा)पक्षाचाआंदोलनाचा इशारा

आरंभ मराठी/उमरगा



गेल्या काही दिवसांपासून उमरगा शहर व परिसरात सतत विजपुरवठा खंडीत होत आहे. यामुळे शेतकरी, नागरिक, व्यवसायिक यांचे हाल होत आहेत. विद्युत पुरवठा पुर्ववत सुरळीत चालु करणे बाबत वारंवार विनंती करूनही टाळाटाळ होत आहे. विद्युत पुरवठा पुर्ववत सुरळीत सुरू करण्यात यावा. जर विद्युत पुरवठा सुरळीत सुरू न झाल्यास तीव्र अंदोलन करण्यात येईल असा इशारा शिवसेना (उबाठा) पक्षाने दिला आहे. या निवेदनावर आ.रजाक बा.अत्तार माजी नगराध्यक्ष, विजयकुमार नागणे जिल्हा प्रमुख शिवसेना, दिंगबर केशव माने, भगवान मामा जाधव जेष्ठ शिवसैनिक, दत्ता शिंदे शोशल मिडिआ प्रमुख, सुधाकर पाटील उप. तालुका प्रमुख, रणधीर गोविंदराव पवार मा. सभापती, आप्पाराव गायकवाड विभाग प्रमुख, पवन त्रिमुखे, बालाजी भुखसे, राजेंद्र सुरवसे, विजय करने, कैलास शिंदे, आरुण गडदे, बनराज दुधभाते, नेताजी बोडके, भोसले एम.के, सदाशिव पाटील, दिवक येळापुर, संतोष स्वामी, शैलेश नागणे, महादेव कोडके, दगडू मुरम, नेताजी, घोडके यांच्या स्वाक्षरी आहेत.

# उपळे येथील हरिभाऊ घोगरे हायस्कूलचा दहावीचा निकाल ८६ टक्के

आरंभ मराठी / धाराशिव

उपळे (मा.) येथील हरिभाऊ घोगरे हायस्कूलचा इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल ८६%लागला आहे. प्रशालेत विशेष प्राविण्यासह १० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. तर प्रथम श्रेणीत २८, द्वितीय श्रेणीत ३२ तर १६ विद्यार्थी उत्तीर्ण श्रेणीत आहेत. गुणानुक्रमे प्रथम क्रमांक कु.मारवडकर श्वेता धनंजय ९६.४०%, द्वितीय क्रमांक कु. आतकरे ईश्वरी विष्णू ८५.२०% तर तृतीय क्रमांक कु. सय्यद आयशा महम्मद ८४.६०% यांनी यश मिळवले. सर्व विद्यार्थ्यांचे उपळे रयत शिक्षण प्रसारक संस्था, उपळे (मा.) चे अध्यक्ष पी. डी. घोगरे, उपाध्यक्ष महादेव (बापू) गवाड, संस्थेचे जनरल सेक्रेटरी अरुण (बापू) घोगरे, सह सेक्रेटरी अनिल (तात्या) घोगरे, सर्व संस्था सदस्य, शाळा समिती तसेच प्रशालेचे मुख्याध्यापक कांबळे टी. डी., सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# विनापरवाना ऑटो रिक्षावर कारवाई करा

## शिवराज्याभिषेक सोहळा समितीचे प्रशासनाला निवेदन

आरंभ मराठी / धाराशिव

धाराशिव शहरातील कायदेशीर परवानाधारक ऑटो रिक्षा, प्रवासी वाहतूक करणारे ऑटो रिक्षा, चालक–मालक हे शासनाच्या नियम अटीच्या अधीन राहून प्रवासी वाहतूक करत आहेत. धाराशिव शहरामध्ये गेल्या कित्येक वर्षांपासून अवैध, बेकायदेशीर, विनापरवाना, विना कागदपत्र स्क्रॅप ऑटो रिक्षांचा सुळसुळाट झालेला आहे. अशी बेकायदेशीर वाहने हजारोंच्या संख्येने असल्यामुळे शहरात गुंडगिरी, दहशत, छेडछाड, चोरी या व अशा अवैध धंद्यांना प्रोत्साहन मिळत आहे. अशा बेकायदेशीर ऑटोरिक्षांमुळे जे ऑटो रिक्षा चालक–मालक परवानाधारक आहेत, शासनाच्या नियम अटींचे पालन करत असतात. सरकारला महसूल भरत असतात अशा प्रामाणिक व कायदेशीर ऑटो रिक्षा चालक मालकांवर प्रचंड मोठा अन्याय होऊन उपासमारीची वेळ आलेली आहे.याबाबत गेल्या वर्षी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय व वाहतूक नियंत्रण शाखा धाराशिव या दोन्ही कार्यालयास निवेदन दिले होते. परंतु, त्याची दखल घेतली नाही. शासन प्रशासन महसूल भरणाऱ्या ऑटोरिक्षांना संरक्षण न देता ते बेकायदेशीर ऑटो रिक्षा चालक मालकांना पाठीशी घालत आहे. तसेच वाहतूक शाखेचे पोलीस परवानाधारक ऑटो रिक्षा चालक मालकांना ऑनलाइन दंड करत आहेत. तो दंड ५०० ते १५०० रुपये इतका असतो. त्यामुळे येत्या आठ दिवसात जर बेकायदेशीर, विना कागदपत्र, विनापरवाना स्क्रॅप ऑटोरिक्षांवर आणि लायसन्स व बॅच नसणारे ऑटो चालक यांच्यावर कठोरात कठोर कारवाई न झाल्यास परवानाधारक ऑटो रिक्षा चालक मालक यांच्या वतीने तीव्र असे आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. या निवेदनावर सर्व पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरी आहेत.





# आपसिंगा येथील नरेंद्र आर्य विद्यालयाचा ९२.३०% निकाल

आरंभ मराठी/तुळजापूर







तालुक्यातील आपसिंगा येथील नरेंद्र आर्य विद्यालयाचा इयत्ता दहावीचा निकाल ९२.३०% लागला आहे.विद्यालयातील ९१ पैकी ८४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांच्या वतीने फेब्रुवारी मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला.यात तालुक्यातील आपसिंगा येथील नरेंद्र आर्य विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे. या विद्यालयाचा निकाल ९२.३०% लागला आहे. विद्यालयातील ९ विद्यार्थी विशेष प्रावीण्याने उत्तीर्ण झाले आहेत.याशिवाय ३५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, ३० विद्यार्थी द्वितीय श्रेणीत तर १० विद्यार्थी तृतीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.विद्यालयातील कपिल महेश राऊत याने ९६.६०% गुण घेऊन प्रथम क्रमांक पटकावला आहे.मेघराज अण्णासाहेब कवटे याने ९३.२०% गुण घेऊन द्वितीय क्रमांक पटकावला.सायली वैजिनाथ शिंदे हिने ९१.६०% गुण घेऊन तृतीय क्रमांक पटकावला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष शिवाजीराव सांजेकर,उपाध्यक्ष उमेश भोसले,सचिव शंकर गोरे, कोषाध्यक्ष विनय भोसले,कल्याण तोडकरी,मंदार रोहीणकर,ज्योती सांजेकर,विद्यालयाचे मुख्याध्यापक जयराज सूर्यवंशी यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केलेआहे.

## काम दर्जेदार करण्याच्या एनएचएआयच्या अधिकाऱ्यांना सूचना

# सर्विस रोडच्या कामाची आ.कैलास पाटील यांच्याकडून पोलखोल

आरंभ मराठी / धाराशिव

शहरातील बायपास रोडलगत सुरु असलेल्या सर्विस रोड, नाली व पथदिव्यांचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याच्या पार्श्वभूमीवर रविवारी शिवसेना (ठाकरे) पक्षाचे आमदार कैलास पाटील यांनी स्वत: जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. कामाचा निकृष्ट दर्जा आणि नागरिकांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन त्यांनी एनएचएआयच्या अधिकाऱ्यांना तातडीने कामाचा दर्जा सुधारण्याच्या सूचना दिल्या.हरालगत पोदार स्कूल ते अभियांत्रिकी महाविद्यालय या मार्गावर दोन्ही बाजूला सर्विस रोडचे काम सुरु आहे. शहरालगत हा रस्ता असल्यामुळे या मार्गावरुन नागरिकांना दररोज ये–जा करावी लागते. या भागात नागरी वसाहत मोठ्या प्रमाणात असून सर्विस रोडलगत रहिवासी क्षेत्र, दवाखाने,मंगल कार्यालय, पेट्रोल पंप, शाळा आहेत. परंतु रस्त्याचे काम करत असताना नाल्यांची उंची वाढविण्यात आलेली असल्यामुळे सर्विस रोडवर येताना किंवा वळताना नागरिकांची मोठी अडचण होत आहे.नालीची उंची रोड च्या लेव्हल ने करून नागरिकांची गैरसोय टाळवी अशा सूचना देण्यात आल्या त्याचबरोबर सर्विस रोडलगतचे विद्युत पोल देखील वेडेवाकडे उभारण्यात आलेले आहेत. त्यामुळे अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर आ.कैलास पाटील यांनी एनएचएआयच्या अधिकाऱ्यांसमवेत सर्विस रोड, नाली व विद्युत पोलच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी केली. नागरिकांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन त्यांनी तात्काळ हे काम दर्जेदार करावे, नालीची उंची कमी करुन विद्युतपोलच्या कामाबाबतही त्यांनी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. त्याचबरोबर नागरिकांना सर्विस रोडच्या कामाबाबत तक्रारी असल्यास आपणाशी थेट संपर्क साधावा, असे आवाहनही यावेळी त्यांनी केले. यावेळी शिवसेनेचे शहरप्रमुख सोमनाथ गुरव, युवासेना शहरप्रमूख रवि वाघमारे, प्रवीण कोकाटे,पंकज पाटील, उमेश राजेनिंबाळकर, ॲड.निलेश बारखेडे, राज निकम, महेश शेरकर, ऋषिकेश धाराशिवकर, ॲड. पवन इंगळे, प्रदीप साळुंके, अक्षय खळदकर शिवसेनेचे पदाधिकारी, नागरिक उपस्थित होते.




# शिंपे शिवारात ३० एकर जमिनीतील वनसंपदेची कत्तल

## पूर्व परवानगी नाही, गावकऱ्यांचा आरोप, कारवाईची मागणी

अविनाश शेलार / आरंभ मराठी

कोल्हापूर: केंद्र आणि राज्य सरकारकडून झाडे लावा, झाडे वाचवा,असा संदेश दिला जात आहे. यासाठी शतकोटी योजना आणली आहे. ग्रामपंचायत आणि शहरातील महापालिका यांना सक्तीच्या सूचना देऊन वृक्षसंपदा जतन करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. मात्र,कोल्हापुरातील शाहुवाडी तालुक्यात शिंपे गावात प्रचंड मोठ्या प्रमाणात वनसंपदा नष्ट केली जात असल्याचे समोर आले आहे.शिंपे या शाहुवाडी तालुक्यातील दुर्गम भागातील गावात सरपंच व उपसरपंच सर्व सदस्य यांनी कोणतीही ग्रामसभा न घेता किंवा गावातील संस्थेला, जिल्हा प्रशासन, वन विभागाला न कळवता किंवा पूर्व परवानगी न घेता तीस एकरातील हजारो मौलिक औषधी आणि आयुर्वेदिक झाडांची कत्तल केली आहे.हा प्रकार रविवारी दुपारी उघडकीस आला.गावकऱ्यांनी हा प्रकार उघडकीस आणून संबंधिताना विचारणा केली असता उडवाउडवीची उत्तरे देण्यात आली.आयुर्वेदिक आणि औषधी गुणधर्म असलेले हजारो मोठमोठे वृक्ष कत्तल करणारे सरपंच उपसरपंच आणि त्यांची ग्राम पंचायत सदस्य तसेच ग्रामसेवक यांच्यावर वृक्षवल्ली कत्तल करणे तसेच जमीन हडप करणे आणि कोणाचाही मुलाहिजा न बाळगता मनमानी कारभार करून भारतीय जमीनक्षत्र एका व जमीन क्षेत्र नष्ट करणे या कलमाखाली सर्वांना अटक करून या सर्वांची चौकशी व्हायलाच पाहिजे अशी जनतेची मागणी आहे.दैनिक 'आरंभ मराठी'शी बोलताना गावातील नागरिक म्हणाले की, कोणतीही जमीन संपादित करताना ग्रामसभा आणि आमसभेचा ठराव लागतो. परंतु या ठकास महाठक या सरपंच उपसरपंच तसेच सदस्य आणि ग्रामसेवक सर्कल किंवा भूमी संपादित मंडळी यांनी सेटिंग करत एकमेकाची वाटणी राखत हा जमीन हडप करणे आणि वृक्ष संपदा नष्ट करणे असे हिंसक कृत्य केले आहे. जिल्हाधिकारी यांनी व जिल्ह्याची वनसंरक्षक अधिकारी यांनी कोणतीही परवानगी दिलेली नसताना हा प्रकार केला आहे. कायद्यामध्ये वनसंपदा नष्ट करणे तसेच सरकारी जमीन हडप करणे आणि आयुर्वेदिक औषधी गुणधर्म वनसंपदा चोरून विकणे तसेच या जंगलातील चंदन किंवा सागवान अतिशय महाग झाडे त्यांची लाकूड फाटा चोरून विकणे हे फौजदारी गुन्ह्याखाली घटना येते. त्यानुसार संबंधितावर कारवाई होईल का,असा प्रश्न विचारलाजातआहे.





# अमृत –२ पाणीपुरवठा योजनेला भूम येथील सर्वपक्षीय नेत्यांचा विरोध

## नळाला मीटर न लावू देण्याचा एकमुखी निर्धार

आरंभ मराठी / भूम

भूम शहराला अमृत २ पाणीपुरवठा योजना मंजूर झाली असून सदर योजनेचे काम युद्ध पातळीवर सुरू असले तरी या योजनेला स्थानिकातून मोठा विरोध होत असल्याचे दिसून येते. पाणीपुरवठा योजना भूम शहरासाठी की ठेकेदारा साठी असा सवाल माजी नगराध्यक्ष विजयसिंह थोरात यांनी पत्रकार परिषदेत केला आहे. यावेळी बोलताना विजयसिंह थोरात म्हणाले की, अमृत योजना –२ अपूर्ण असताना नागरिकांना नळ कनेक्शन कशासाठी देताय हा प्रश्न प्रशासकीय अधिकाऱ्यांना केला आहे. शासकीय विश्रामगृह भूम येथे सर्व पक्षीय पदाधिकारी यांनी अमृत योजना –२ वाढीव पाईप लाईन संदर्भात पत्रकार परिषद आयोजित केली होती. यावेळी बोलताना थोरात म्हणाले की, आरसोली येथील वाढीव पाईप लाईन माझ्या कारकिर्दीत मंजूर झाली होती. पाईप उत्तम प्रतीचे वापरण्यात आले आहेत. शहरातील नागरिकांचा पुढच्या ५० वर्षाचा विचार करून योजना कार्यन्वीत करण्यात आली होती. तेव्हा विकास स्वत:साठी करायचा की, गावाच्या विकासासाठी हे विरोधकांनी ठरवावे. बाणगंगा तलावातून पाणी पुरवठा सुरळीत सुरू होता. दररोज भूम शहराला पाणी पुरवठा केला जात होता. परंतु बाणगंगा तलावावरील पाणीपुरवठा बंद झाल्याने आता चार दिवसाआड पाणी घेण्याची वेळ शहर वासियांना आली असल्याचे सांगितले. नियोजन चुकल्याने कृत्रिम पाणी टंचाई होत आहे. शासन दरबारी एवढ्या योजना असूनही अमृत योजना घेण्याचे कारण काय असा सवाल करत शहरातील नागरिक शेतकरी असताना तसेच भूम शहर दुष्काळी तालुका असताना, मीटर लावून पाणी परवडणारे नाही. सदर योजनेचे वंजारवाडी तलावावर पाईप पोहचले नाहीत. पंपिग स्टेशन नाही. मग नागरिकांना कशाचे नळ कनेक्शन देता? हवेचे नळ कनेक्शन देता काय असा सवाल यावेळी करण्यात आला. अमृत योजने मध्ये मीटरची तरतूद असल्याने अमृत योजनेचे पाण्यासाठी मीटर लागणार आहेत. त्यामुळे नागरिकांनी आता सावध व्हावे. असे आवाहन थोरात यांनी केले आहे .सदर पत्रकार परिषदेमध्ये भाजप तालुकाध्यक्ष संतोष सुपेकर, उबाठा गटाचे तालुकाध्यक्ष अनिल दादा शेंडगे, पँथर सेनेचे नेते चंद्रमणी गायकवाड, राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे शहराध्यक्ष विनोद नाईकवाडी, राष्ट्रवादी मागासवर्गीय सेलचे तालुकाध्यक्ष गणेश साठे, ॲड अमृताताई गाढवे, माजी शहर प्रमुख दीपक मुळे, भाजप शहराध्यक्ष बाळासाहेब वीर, बच्चन शेठ गायकवाड, दीपक पवार, पिंटू पाटील तसेच पदाधिकारी उपस्थित होते.

